INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 5 | JUNE - 2023

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची स्त्रीविषयक भूमिका

**सौ. सीमा विजय कारंडे**
**एम.ए.बी.एड.**
**सहाय्यक शिक्षिका, सांताक्रूझ (पूर्व) म.न.पा.माध्यमिक शाळा, मुंबई.**

**सारांश:**



विसाव्या शतकातील महान समाजक्रांतीकारक नेते आणि विचारवंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाला विचारांची एक नवी दिशा दिली. त्यांनी देशातील दलित, पिडीत शोषित समाजाला जागे करण्याचे कार्य त्यांनी केले. अमानवी विचारावर तुटून पडणारा आणि त्या विचारांच्या जागी स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांची प्रत्यक्ष प्रस्थापना करणारा महान समाजक्रांतीकारक, एक अर्थतज्ञ, राजकीय जीवनात एक व्यक्ती एक मत, एक मूल्य आणि राजकीय लोकशाहीचे समाजिक लोकशाहीत रुपांतर झाले पाहिजे हे स्वतः प्रमुख शिल्पकार संविधानाच्या माध्यमातून आग्रहाने प्रतिपादन करणारा राजकीय विचारवंत, प्रसंगी स्वतःच्या समाजहिताला बळी देवून देशहिताला प्राधान्य देणारा थोर राष्ट्रभक्त भारताला आवश्यक शैक्षणिक धोरणाचा मूलतः विचार करुन वंचितांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणारा थोर शिक्षणतज्ञ अशा विविध जीवनस्पर्शी पैलुंनी साकारलेले व्यक्तिमत्त्व आणि समग्र क्रांतीचे जनक म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते असे महामानव विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

**प्रस्तावना :**

लॉर्ड माऊंटन बॅटननी बाबासाहेबांच्या कार्याचे वर्णन एक धाडसी यौद्धा 'ब्रेव्ह फाईटर' असे केले आहे. म्हणजेच कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीमध्येही लढा उभा करुन जनजागृती करणारा सामाजिक न्यायासाठी धाडसाने प्रस्थापिताविरुद्ध लढा जिंकणारा खऱ्या अर्थाने धाडसी यौद्धा म्हणून केलेला उल्लेख यथार्थ आहे असे म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लेखनातून वा आपल्या वेळोवळी समाजबांधवाना उद्देशून केलेल्या भाषणातून जातीअंतासंबंधी मांडलेल्या विचारातून स्त्रीविषयक विचार मांडलेले आहेत. भारतीय स्त्रियांच्या प्रश्नांची चर्चा करताना महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्स या विचारांचा आधार घ्यावा लागतो. महात्मा फुले यांनी सत्यशोधकाची भूमिका घेत तत्कालीन समाजातील सत्य समाजाच्या वेशीवर टांगले. त्या कालखंडातील स्त्री प्रश्नांचा वेध महात्मा फुले यांनी याच सत्यशोधकी पद्धतीने घेतला वर्ण जात आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेविरुद्ध केवळ विचार मांडून थांबले नाहीत तर त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून स्त्रियांच्या परवशतेला विरोध केला. महात्मा फुले नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अत्यंत बुद्धिवादी पद्धतीने भारतीय स्त्री, शूद्रांचे प्रश्न समजून घेतले आणि विषमतेविरुद्ध व्यापक चळवळ उभारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित स्त्रियांचे दुहेरी शोषण लक्षात घेऊन दलित स्त्रियांमध्ये जागृती केली. बाबासाहेबांचे कार्य केवळ दलित स्त्रियांपुरतेच मर्यादित नव्हते तर समग्र भारतीय स्त्रियांचे प्रश्न आणि संपूर्ण भारतीय स्त्रियांच्या दलितत्वाची त्यांना पूर्ण जाणीव होती. पण दुर्देवाने स्त्रीमुक्तीचा बाजू घेणारा हिंदू कोड बिलास सवर्ण वर्गातील स्त्रीकडून झाल्याने त्यांना अतिव दुःख झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधामधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित चळवळीद्वारे अस्पृश्य स्त्रियांचे केलेले प्रबोधन, स्त्रीमुक्तीसाठी जातीअंताचा मांडलेला सिद्धांत, आणि समग्र स्त्रीजीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी हिंदू

कोड बिलाचा आग्रही भूमिका या सर्वांचा विचार केल्याशिवाय डॉ. बाबासाहेबांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन समजू शकणार नाही. हे लक्षात घेऊन पुढील बाबींचा विचार करुन त्यांचा स्त्रीविषयक दृष्टीकोन, वा भारतीय स्त्रियांविषयीची भूमिका समजून घेता येईल.

**दलित चळवळ आणि स्त्रियांचे प्रबोधन :**

भारतीय स्त्रियांचा विचार करताना केवळ एकाच परिप्रेक्ष्यातून करुन चालणार नाही. तर वर्ग, समाज, जातपात यासंदर्भात करावा लागतो. येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री प्रश्नासंदर्भात आणि जाती प्रश्नासंदर्भात केलेली मांडणी लक्षात घेणे महत्वाचे ठरेल. 'डॉ. आंबेडकरांनी स्त्रियांना 'जातीचे प्रवेशद्वार' असे म्हटले आहे. जातीप्रश्न आणि स्त्रीप्रश्न यांचा एकत्रित विचार बाबासाहेबांनी केला आहे.'[१] दलित चळवळ आणि स्त्री चळवळ यांचे नाते जवळचे आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी योजलेल्या दलित या संकल्पनेमध्ये सर्व उपेक्षित वर्गासह स्त्रियांचाही समावेश केलेला आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने ज्यांना वर्षानुवर्षे उपेक्षितांचे जीवन जगण्यासाठी भाग पाडले ते सर्व दलित अशी दलित्वाची व्यापक संकल्पना डॉ. बाबासाहेबांना अभिप्रेत होती.याचाच अर्थ स्त्रियांदेखील दलितच आहेत. सवर्ण कुटुंबातील स्त्रीदेखील दलितच आहे. कारण तीदेखील दलिताप्रमाणे न्याय हक्कांपासून वंचित आहे. पण यातील दुर्देवाचा भाग असा की डॉ. बाबासाहेबांना दलित या संज्ञेत अभिप्रेत असलेली स्त्री मात्र यांच्या या आंदोलनापासून दूरच राहिली. त्या कालखंडात संपूर्ण भारतीय स्त्रिया सहभागी झाल्या असत्या तर आजचे सामाजिक चित्र काही वेगळेच झाले असते.असे निरीक्षण डॉ. वंदना महाजनी आपल्या 'स्त्रीवादी चळवळीसमोरील आव्हाने' या लेखामध्ये नोंदविताना दिसतात. आंदोलनात सहभागी झालेल्या दलित स्त्रीची वेदना दुहेरी स्वरुपाची होती. एक दलित म्हणून आणि दुसरी स्त्री म्हणून.दलितत्व नाकारुन मानवी हक्क मिळावे याकरिता स्त्री-पुरुष समानता निर्माण होणे गरजेचे आहे. हे ओळखून डॉ.बाबासाहेबांनी दलित वर्गातील स्त्रियांना आंदोलनात सहभागी करुन घेतलेले दिसून येते. याचे करण म्हणजे स्त्रिया शिकल्या आणि त्यांची अस्मिता जागृत झाली म्हणजे त्या आपल्या कुटुंबाला पुढे नेतील, मुलांना आत्मनिर्भर करतील यावर डॉ. बाबासाहेबांचा विश्वास होता आणि हा विश्वास दलित स्त्रियांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला.'स्त्रीवर्गात जागृती झाली तर त्या अस्पृश्य समाजाची फार मोठी प्रगती घडवून आणू शकतात. महिलांची संघटीत संस्था असावी यावर माझा विश्वास आहे. सामाजिक दुर्गुण नाहीसे करण्यात त्यांची फार मोठी सेवा आहे. स्त्रियांनी किती प्रमाणात प्रगती केली यावरुन मी दलित समाजाच्या प्रगतीचे मोजमाप करतो.' अशी डॉ. बाबासाहेबांची भूमिका होती. आणि त्यासाठी त्यांनी आपल्या चळवळीत दलित स्त्रियांना सामील करुन घेतले. स्त्री-पुरुष समानता निर्माण करायची असेल तर प्रथम चातुर्वर्ण्य व्यवस्था नष्ट झाली पाहिजे याची जाणीव त्यांना होती. म्हणूनच ते शूद्रांना व स्त्रियांना अन्यायी व जाचक ठरणारा मनुचा जाहीर धिक्कार करुन संहितेचे दहन केले. यावेळी स्त्रियांना आपल्या अस्मितेची जाणीव करुन दिली. 'ब्राह्मण स्त्रियांच्या पोटी जन्म घेतलेल्यावर सन्मानाचे जीवन जगता येते आणि तुमच्या पोटी जन्म घेतल्यावर मात्र अमानुष असे गुलामगिरीचे जीवन जगावे लागते याचा तुम्ही विचार केला का?'[२] असा वस्तुनिष्ठ प्रश्न उपस्थित करुन त्या स्त्रियांना विचारप्रवृत्त करताना दिसतात. समाजव्यवस्थेने आपल्यावर लादलेले गुलामगिरीचे आयुष्य आपल्या सर्व सवयीतून सहजपणे लक्षात येते. त्यासाठी आपण आपल्या खाण्यापिण्याच्या वा राहणीमानाच्या सवयी सोडून दिल्या पाहिजे म्हणजेच दलितत्व लादणाऱ्या या बाह्य सवयीचा त्याग केल्याशिवाय आपल्यात बदल घडून येणे शक्य नाही हे डॉ. आंबेडकरांनी पटवून दिले. साडी नेसण्याची पद्धत कशी असावी आणि कथल्याचे अवजड दागिने वापरणे किती चुकीचे आहे हे स्त्रियांना समजावून दिले. 'कितीही बिकट परिस्थिती असली तरी तुमच्या मुलांमुलींना शाळेत पाठवित जा पुरुष मंडळींनी घरात मृतमांस आणले तर त्याला सक्त विरोध करा. कपडे फाटके असतील तर शिवून व धुवून वापरा स्पृश्य स्त्रियांमध्ये आणि तुमच्यात कोणताच फरक असता कामा नये. आपण एवढी जरी जबाबदारी स्वीकारली तरी समाजाच्या उद्धारकार्यात आपण भाग घेतला असे होईल.' यातून डॉ. बाबासाहेबांना स्त्री-पुरुष समानता अभिप्रेत होते हे यातून स्पष्ट होते. दलितमुक्ती आणि स्त्रीमुक्तीचा पुरस्सकार डॉ. बाबासाहेबांनी केला. १९४२ च्या महिला परिषदेपुढे भाषण करताना आंबेडकरांनी म्हटले, 'मुलामुलींचे लग्न लवकर करु नका. निदान त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहू द्या. जास्त मुले होण्याचे दुष्परिणाम त्यांच्या लक्षात आणून द्या. विवाह हा मुलीच्या विकासातील अडसर आहे.विवाह मुलींवर लादू नका.लग्नानंतर पत्नी ही नवऱ्याची सखी व समान अधिकार असलेली गृहणी असली पाहिजे.नवऱ्याची ती गुलाम असता कामा नये.' या उद्‌गारातून त्यांनी कुटुंबात स्त्रीला कोणती वागणूक दिली जावी, योग्य वयात मुलींचे लग्न व्हावे जेणे करुन विवाह हा मुलामुलींच्या विकासातील अडथळा बनू नये याविषयीचे आपले मत येथे स्पष्ट करताना दिसतात.?

घरप्रपंचाच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात त्याप्रमाणे समाजाच्या संसारातील अडचणी स्त्रीपुरुषांनी मिळून सोडवावयास पाहिजेत असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब करतात.

## जातीव्यवस्था आणि स्त्रियांचे शोषण :

जातीय शोषणात लैंगिक-शोषण अंतर्भूत असते. आजपर्यंत जातीयव्यवस्थेने रचलेल्या उच्च-नीच, शील, नैतिक, अनैतिक यासर्वच संकल्पना कष्टकरी स्त्री-पुरुषांचे शोषण करणाऱ्या आहेत. त्यांना दुय्यम ठरणाऱ्या आहेत असे मत डॉ. प्रतिमा परदेशी आपल्या डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती या ग्रंथात मांडतात. येथे डॉ. आंबेडकर स्त्रियांच्या शील वा चारित्र्याविषयी आपले मत मांडत नसून स्त्रियांच्याद्वारे जातीयव्यवस्था कशा निर्माण केल्या जातात हे येथे स्पष्ट करतात. जातीअंताच्या लढाईचे नेतृत्व स्त्रियांनी करावे असे अग्रहाचे प्रतिपादन करतात. दलित स्त्रियांमध्ये शील, करारीपणा आणि धमक आहे त्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे असे त्यांचे मत असल्याचे स्पष्ट होते. भारतातील स्त्रियांचे दास्य जातीव्यवस्था वर्गव्यवस्था आणि पुरुषसत्ता या शोषण संस्थामधून तीव्र झाले आहे. तसे पाहिले तर जातीव्यवस्था भारतीय स्त्रियांचे शोषण करणारी संस्था आहे.जातीव्यवस्थेमुळे स्त्रियांच्या शाषणात अधिकच भर पडत असल्याचे मत डॉ. आंबेडकरांचे आहे. जातीवर आधारित कायदे स्त्रियांना गुलामीत ठेवण्यास हातभार लावणारे आहेत असे म्हणता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिपादनामध्ये जातीव्यवस्था स्त्रियांचे शोषण करणारी प्रमुख संस्था असल्याचे प्रतिपादन सातत्याने येताना दिसते. अस्पृश्य स्त्रियांना जातीव्यवस्था ही दास्याची बेडी असल्याचे पटवून देतात. म्हणूनच अस्पृश्य स्त्रियांनी जातीअंताच्या लढाईत सहभागी व्हावे याकरीता ते आग्रह धरतात. स्त्रियांनी जर अस्पृश्यता निवारण्याचे काम अंगावर घेतले तर ते पुरुषापेक्षाही लवकर यशस्वी होतील असा स्त्रियांच्या कार्यक्षमतेविषयीचा विश्वास आपल्या २७ डिसेंबर १९२७ च्या भाषणातून स्पष्ट केले आहे. याच भाषणातून ते म्हणतात, ‘अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न पुरुषांचा नसून तुम्हा स्त्रियांचाच आहे. तुम्ही आम्हा पुरुषांना जन्म दिलेला आहे. आम्हाला इतर लोक कसे जनावरांपेक्षाही कमी लेखतात, हे तुम्हास ठाऊक आहे. काही ठिकाणी आमची सावलीसुद्धा घेत नाहीत.इतर लोकास कोर्टकचेऱ्यामध्ये मानासन्माच्या जागा मिळतात. परंतु तुमच्या पोटी जन्मलेल्या आम्हा मुलांना पोलीस खात्यात शिपुर्ड्याचीही नोकरी मिळत नाही. इतका आमचा दर्जा हीन आहे. हे सर्व तुम्हास ठाऊक असताना तुम्ही आम्हास जन्मास का घातले असा प्रश्न तुम्हास केला तर त्याचे उत्तर तुम्ही काय देऊ शकाल?’[3] या भाषणातून दलित स्त्रियांमध्ये जाणीव जागृती करुन देत असतानाच आपल्यामध्ये हजारो वर्षे रुजलेल्या न्यूनतेच्या मानसिकतेला आपण प्रथम नाकारले पाहिजे अशी शिकवण देतात. थोडक्यात जातीव्यवस्था आणि स्त्री शोषण यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काळाच्या कसोटीवर म्हणजे वैज्ञानिक आधार नसणाऱ्या बाबींना टाळताना गुरुत्वाला तसुभरही धक्का लागू दिलेला नाही. वास्तविकतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःहून स्वीकारलेले तीनही गुरु हयात नसलेले स्वीकारले आहेत. ते केवळ सिध्दांत आणि आचार विचार यांच्या पातळीवर विज्ञाननिष्ठ नमोविश्लेषण तथागतांना त्यांनी स्वीकारले आणि अनुसरलेसुध्दा तसेच संत कबीर आणि महात्मा जोतीबा फुले यांनी स्वीकारताना बुध्द, कबीर, जोतीराव यांच्या स्वप्नातील ‘समाजमन’ आणि सामाजिक व्यवहार वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला. भले ही मग त्यासाठी विविध प्रकारचे लेखन, चिंतन, आणि मनन करुन भारत देशासाठी स्वतंत्र ‘संवैधानिक समजासंस्कृती’ भारतीय संविधानाद्वारे हरएक भारतीय नागरिकांप्रती समप्रित केली.

समाजसुधारक हा आपल्या काळात परिवर्तनवादी असतो पण नंतरच्या काळात मात्र तो परिवर्तन सर्वत्र संत आपआपल्या कालखंडात पुरोगामी विचाराचे होते. भारतीय समाजसुधारचे कार्य आणि वैचारिक धोरण आणि चळवळ परिवर्तनवादी व प्रबोधनात्मक होते. परंतू आजच्या संदर्भात काहीचा अपवाद वगळता त्याला बदलते स्वरुप प्राप्त करुन घ्यावे लागते. परंतू भारतामध्ये असे काही महापुरुष होऊन गेले आहेत की, त्यांचे विचार कितीही काळ लोटला तरी त्या परिस्थितीत ते सर्वश्रेष्ठ आहेत बुध्द, फुले, कबीर, शाहू आणि विश्वमहामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तिंचे विचार, तत्वज्ञान, साहित्य, समाजाविषयीचे ध्येयधोरण हे हे कोणत्याही परिस्थित तंतोतंत लागू होतात. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाज, राजकारण, धर्मकारण, शेती, जल, आर्थिक विचार आणि परराष्ट्रविषयीचे ध्येय धोरणे आजच्या घडिला तंतोतंत लागू होतात. जगातील सर्वात मोठा लोकशाही देश, जितक्या वनस्पती तितक्या जाती, जेवढे खाद्यपदार्थ तितक्या भाषा हे सर्व अजूनही टिकून आहे, ती केवळ डॉ. आंबेडकरांनी लिहलेल्या राज्यघटनेमुळे पाश्चात्य विचारवंत म्हणतात की, इतके भीन्न भीन्न प्रकारचे लोक एकत्र राहतात कसे तर त्याचे उत्तर आहे. भारतीय राज्यघटना तो या देशाचा धर्मग्रंथ.

**महात्मा फुले व डॉ. आंबेडकर :**

वरिल दोन्हीही महापुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले असले तरी विचार आणि ध्यास सारखाच होता परिवर्तनवादी समाज निर्माण झाला पाहिजे, मानव समाजामध्ये समता नांदली पाहिजे याच ध्येयाने प्रेरित झाले होते. दोघांच्याही नावात पराक्रम दिसून येतो. ज्योत म्हणजे प्रकाश व ज्ञान असा अर्थ होतो. तर भीमराव शक्ती आणि संघटना दर्शविते वरिष्ठ समाजाकडून दोघांनाही त्रास सहन करावा लागला दोन्हीही महापुरुषांनी प्राचीन धर्मग्रंथ, देव इश्वर, नाकारला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जरी सत्यशोधक समाजाचे अनुयाई नसले तरी ते खरे सत्यशोधक आहेत. कारण दोघेही परंपरेचे उच्छेदक व गुलागिरीविरुध्द बंड बंड करणारे होते. समाजकारणामध्ये दोघांनाही घराण्यातील परंपरा नव्हती.

**स्वतंत्र विचारसारणी :**

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबडेकर दोन्ही महापुरुष स्वतंत्र विचाराचे होते. ख्रिस्ती मिशनरी शाळेत शिक्षण घेऊन व बाबा पद्मबाजी व रे. शेषाद्री इ. जोतीरावांचे मित्र असून ही ख्रिस्ती झाले नाहीत. बायबल व ख्रिस्ती धर्माचा चिकित्सक अभ्यास केला. परंतू ते ख्रिश्चन मुळीच झाले नाहीत. स्वतःचा सार्वजनिक सत्यधर्म नावाचा विवचार स्वीकारला, लहूजी वस्ताद साळवे यांच्या आखाड्यांत जोतीरावानी लष्करी विद्येचेक प्रशिक्षक पुर्ण केले. त्यांच्या बरोबर वासुदेव बळवंत फडके, बाळ गंगाधर टिळक हेही होती. परंतू मार्ग त्यांनी स्वीकारला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेत शिक्षण घेऊन जगातील बऱ्याच संस्कृतिचा ख्रिश्चन, मुस्लिम धर्माचा अभ्यास करुनही बौध्द धर्म स्वीकारला त्या काळात प्रबोधनाच्या अनेक चळवळी होत्या. परंतू स्वतःची हरिजन संघटना, स्वतःचे वर्तमान पत्रे, स्वतःचा रिपब्लिकन पक्ष, मजूर पक्ष, अशा प्रकारे अनेक घटना प्रसंग दोघांच्या विचारात कार्यात दिसून येतात. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया चरला मुलिंसाठी स्वतंत्र शाळा सुरु केली. अनाथ बालकाश्रम, पुर्नविवाह, जाती धर्मा विषयी आवाज उठविला. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल संसदेमध्ये मांडून स्त्री उध्दाराचे महत्त्वाचे पाऊल उचलले, स्त्रियांच्या संरक्षणाचे, आत्मसन्मानाचे कायदे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करुन काळानुरुप बदल घडविण्याचे कार्य केले आहे.

महात्मा फुलेंच्या स्वप्नातील सत्यशोधक समाजाला वास्तवतेचा आकार देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘भारतीय संविधनाचा’ यशस्वी उपयोग करुन घेण्याचा प्रयत्न केला. आणि त्यात ते यशस्वी झाले. महात्मा फुलेंच्यचा समाजपरिवर्तनाचा आणि नवसमाज उभारणीच्या ध्येयवादाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जोतीराव फुलेंच्या कालखंडात विशाल मानवतेच्या आणि इहवादी वैज्ञानिक दृष्टीकोनाच्या आधारे संविधान संस्कृतीच्या रुपात लोकशाही मार्गाने प्रगल्लता आणि भक्कमपणा प्राप्त करुन देण्याचा प्रयत्न केलेला आपणास दिसून येतो.

**जातीव्यवस्था, विवाहसक्ती आणि स्त्रियांचे शोषण :**

जात्यंतर्गत विवाहसक्ती आणि स्त्री-शोषण यांचा जवळचा संबंध आहे. विवाहबंदी हे जातीयव्यवस्थेचे लक्षण मानले जाते. मिश्र विवाहपद्धतीला जातीव्यवस्थेकडून सक्त विरोध होतो. वा मिश्र विवाह हा वैध मानले जातात.‘अनुलोम विवाहाला मान्यता देऊन मनूने विवाहप्रथेद्वारे सर्वार्थाने स्त्रियांवर अन्याय केलेला आहे.’[४]या अनुलोम विवाहात स्त्री कनिष्ठ जातीय व पुरुष व पुरुष वरिष्ठ जातीय असतो.पण प्रतिलोम विवाहात वरिष्ठ जातीतील स्त्री आणि कनिष्ठ जातीतील पुरुषाचा विवाह होतो.पण मनुने हा प्रलोम विवाह निषिद्ध मानलेला आहे. याप्रकारच्या विवाहामुळे जात तुटून जाईल म्हणून प्रतिलोम विवाहास मनूने विरोध केल्याचे दिसून येते. प्रत्येक वर्णाने आपापल्या वर्णातील स्त्रीशीच विवाह करावा असा मनूचा दंडक होता हे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. डॉ. गेल ऑम्व्हेट दलित ॲड द डेमॉक्रोटिक रेव्हूलेशन या ग्रंथात म्हणतात ‘ मातृप्रधान समाजाचे सरंजामी समाज व्यवहारात टिकून राहिले आहेत. त्यांचे संस्थीकरण दलित स्त्रियांचा उपभोग पुरुषांनी उपभोग घेण्यासाठी केला’[५] ही परिस्थिती खेड्यात जातीय व्यवहारात टिकून असल्याचे दिसून येते. जातीव्यवस्थेने स्त्रियांचे लैंगिक शोषण केले या लैंगिक अत्याचाराच्या विरोधातही डॉ.बाबासाहेब आंबेडकर भूमिका घेतात.

**महिलांमध्ये स्वाभिमान जागृतीचे कार्य :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केवळ दलितांच्या, शेतकऱ्यांच्या, कामगारांच्या रंजल्या गांजलेल्या बहुजन समाजाच्या उध्दारकडेच लक्ष दिले असे नाही, तर त्यांनी स्त्रीयांचे ही प्रश्न सोडविण्यासाठी आपली विद्वत्ता, बुध्दिमत्ता व कर्तव्यशक्ती कामी आणण्याचा कसोशीने प्रयत्न केला.

भारतीय स्त्री ही समाजाची आधारशीला आहे. आपल्या संस्कृतीचे ते अस्सल प्रतिक आहे. नीतीमत्तेचे ते श्रध्दास्थान आहे. त्यांना पुरुषांप्रमाणे समान हक्क, समान न्याय, समान प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे. स्त्रीसंबंधीचे

डॉ. बाबासाहेबांचे केवढे निस्सीम प्रेम, उध्दारमनाची तळमळ व कळकळ होती. हे त्यांनी अखिल स्त्रीयांना वेळोवेळी केलेल्या उपदेशातून दिसून येते. ते असे की, ''तुम्ही आपणास कमी लेखू नका, घरी स्वच्छता ठेवा, इतर स्त्रीया साड्या नेसतात त्या पध्दतीने नेसा. फाटके का लुगडे असेना, ते स्वच्छ असावे. तुमच्या पोटी जन्म घेणे हे पाप का व्हावे ? इतरांच्या पोटी जन्म घेणे हे पुण्यप्रद का ठरावे ? त्यांचा तुम्ही विचार करा. तुम्ही अशी प्रतिज्ञा करा की, अशा कलंकित स्थितीत यापुढे जगणार नाही. दगिने घालायचे असेल तर सोन्याचे घाला, मेलेल्या जनावरांचे मांस खाण्याचे बंद करा. दारूड्या नवऱ्यांना, भावांना अगर मुलांना जेवायला घालू नका, मुलींना शिक्षण दया, ज्ञान आणि विद्या या दोन्ही गोष्टी स्त्रीयांना आवश्यक आहेत. 'पुत्र व्हावा ऐसा गुंडा ! त्याचा त्रिलोकी झेंडा !' अशी महत्वाकांक्षा बाळगून जगा. डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या या उपदेशाचा स्त्रीयांच्यावर लगेच परिणाम झाला. डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे स्त्रीयांनी वेश धारण करायला सुरूवात केली. हा डॉ. बाबासाहेबांनी सुरू केलेल्या युगधर्माचा प्रतापच म्हणावा लागेल. आपल्या भगिनींनी शिकावे, उच्चवर्णिय स्त्रीयांप्रमाणे दिसावे, वागावे, स्वाभिमानाने जगावे असे डॉ. बाबासाहेबांना अतिशय तळमळीने वाटत असे.

हिंदू स्त्रीयांची उन्नती आणि अवनती'' हा लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांची भूतकालीन व वर्तमान स्थितीचे वर्णन करणार आहे. हा लेख मुळातून वाचावा इतका महत्वाचा आहे. एकेकाही शंकराचार्याबरोबर वाद करून त्यात सरशी मिळवणारी भारतीय विदुषी स्त्री इतकी अवनत का झाली ? ह्या प्रश्नाचे उत्तर डॉ. बाबासाहेब देतात की, मनुमुळे ! स्त्रीयाचे जर सर्वांत जास्त नुकसान कुणी केले असेल तर ते मनुने. 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हती' असे म्हणून मनुने स्त्रीयांना हजारो वर्षांच्या गुलामगिरीच्या खाईत लोटून दिले. या अंधारयात्रेत भारतीय स्त्री आपलय सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक बाबींमध्ये परावलंबनाशिवाय दुसरे काहीही प्राप्त करू शकली नाही. मनुप्रणीत स्त्रीयांची दैना इथेच थांबली नाही तर मुरळी सारखी प्रथा ईश्वरासंमत ठरवून हजारो निष्पाप युवतींच्या जीवनाची राखरांगोळी केली. संस्कार, शिक्षण व स्वावलंबन यांच्या अभावी हिंदू स्त्री शुद्रापेक्षा ही हीन झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म' या महान ग्रंथाची निर्मिती करून आजच्या स्त्रीला आचरणाची एक नवी दिशा दाखविली. स्त्रीचा न्यूनगंड नेमका दूर करून स्त्री फक्त चूल—मूल सांभाळणारी पुरूषाची दासी एवढीच तिची भूमिका नसून ती एक शक्ती आहे. ती धैर्याचे महामेरू जन्माला घालते. सुखदुःखाच्या पलिकडची वेदना घेऊन ती पुरूषांना घडविते. तिच्या सुप्त गुणांची पारख करून विकासाच्या नवनव्या दिशा जर तिला प्राप्त झाल्या तर प्रत्येक क्षेत्रात तिची आगेकूच राहिल हे डॉ. बाबासाहेबांनी स्पष्ट केले. भगवान बुध्दाने स्त्रीयांना दिलेली समतेची वागणूक व तिचा सामाजिक उच्च दर्जा हा जगातील कोणत्याही धर्मापेक्षा आणि राष्ट्रापेक्षा अभिनव व एकमेव असाच आहे. गौतम बुध्दाने स्त्रीयांना संघात प्रवेश देऊन जे युगप्रवर्तक कार्य केले त्या कार्याला या इतिहासात तोड नाही.

### हिंदू कोड बिल आणि स्त्रीविषयक भूमिका :

भारतातील स्त्री आणि शूद्रांना मानवी हक्क मिळवून देण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी आयुष्यभर झटले. सामाजिक समता भारतात निर्माण व्हावी हे स्वप्न उराशी बाळगून ते पुरुषप्रधान व्यवस्थेशी, जातीव्यवस्थेशी सतत संघर्ष करत राहिले. पुरुषसत्ताक व्यवस्थेची हुकुमशाही व स्त्रियांची गुलामगिरी संपुष्टात आणल्याशिवाय खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समता निर्माण होणार नाही ही महात्मा फुलेंच्या विचाराचा वारसा पुढे घेऊन जाऊन त्या विचाराला प्रत्यक्ष आचारात आणण्याचे कार्य डॉ. आंबेडकरांनी केले असे म्हणता येईल. स्त्रीला भोगवस्तू समजणारे स्त्रियांचे अस्तित्व नाकारणारे कायदे मनूने केले होते. या जाचक बंधनातून स्त्रीची मुक्तता करण्याच्या हेतूने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री - स्वातंत्र्याचा पुरस्कार हिंदू कोड बिलाद्वारे केला. पण हिंदू कोड बिलांला विरोध करणाऱ्या वृत्तपत्रवाल्यांनी 'आंबेडकर स्मृती'या शब्दांनी कुचेष्टा केली. तरीही डॉ. आंबेडकरांनी आपल्या भूमिकेपासून हटले नाहीत. करण अखिल मानवाचा विकास यातून होणार होता, हे त्यानी ओळखले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हिंदू कोड बिलाचा उद्देश म्हणजे हिंदू परंपरांवर आधारीत असलेली क्रूर विषमता, समाजातील रुढीपरंपरा की ज्या स्त्रियांना मानसिक आणि शारीरिक दुबळे बनवितात, स्त्रियांचे स्वातंत्र्य नष्ट करतात अशा विषमतेत जळणाऱ्या स्त्रियांना स्वतंत्र करणे, समान हक्क प्राप्त करुन देणे. 'हिंदू कोड बिल म्हणजे सामाजिक असमानता, भेदभाव, विषमता पसरविणाऱ्या आणि स्त्रियांना बंदिस्त ठेवणाऱ्या चालीरीतींवर प्रहार होता.'[६] हे सर्व जातीतल्या, वर्गातल्या वा धर्मातल्या लोकांना लागू करण्यात येणार होते. पण सनातनी लोकांनी केलेल्या विरोधामुळे बिल पारित होऊ शकले

नाही. २६ सप्टेंबर १९५१ ला पं. नेहरु यांनी डॉ. आंबेडकरांच्या कोड बिलाला स्थगित ठेवण्याचा आदेश दिला तेव्हा जास्त दुःख कोणाला झाले असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना झाले इतर कोणत्याही भारतीय स्त्री-पुरुषांना झाले नाही. बिलाच्या स्थगितीच्या आदेशानंतर ते आपली प्रतिक्रिया देताना ते म्हणतात, 'न रडत, भाकत माझ्या हिंदू कोडबिलाला ठार मारले गेले आणि गाडले गेले, स्वतःच्या मुलाचा मृत्यू झाला असता तरी अधिक दुःख मला झाले नसते, पण माझ्या हिंदू कोड बिलाच्या खुनाने मी जास्त दुःखी झालो आहे.'[७]यावरुन डॉ. आंबेडकरांना या बिलाचे महत्त्व किती वाटत होते हे येथे स्पष्ट होते. पार्लमेंटपुढे यापूर्वी आलेल्या किंवा येणाऱ्या कोणत्याच कायद्याची बरोबरी या हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही असे त्याचे महत्त्व आहे. हे स्वतः डॉ, बाबासाहेबांनी मान्य केले होते. यावरुन या हिंदू कोड बिलाचे महत्त्व लक्षात येण्यास कोणतीच हरकत नसावी.

भारतीय हिंदू समाजाने बुद्धांचे अहिंसा हे तत्त्व स्वीकारले पण त्याच्या बरोबरीने असणारे समता हे तत्त्व हेतूपुरस्सर बाजूला ठेवले. जर अहिंसेबरोबर समतेचे तत्त्व स्वीकारले असते तर समाजात विषमता निर्माण झाली नसती आणि स्त्री-पुरुष समानतेची लढाई लढण्याचा प्रश्नच उदभवला नसता. भारतीय समाज मागास राहण्याचे कारण जर कोणते असेल तर भारतीय स्त्रियांना समानतेच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले आहे हे होय. हिंदू कायद्याने भारतीय स्त्रीला शूद्र, गुलाम,आणि उपभोगाची वस्तू म्हणून स्थान दिले होते. या कोड बिलाने भारतीय राजघटनेतील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची हमी भारतीय स्त्रीला मिळणार होती. सर्व समाज क्रमाने एकत्र आला असता. स्त्री-पुरुषभेद, जातीभेद, धर्मभेद या सर्व भेदांच्या संकल्पना संपून आधुनिक प्रगत आणि पुरोगामी विचारसरणी या हिंदू कोड बिलाच्यामाध्यमातून साध्य झाली असती असे म्हणता येईल.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री शिक्षण विषयक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्याचा विचार करताना स्त्रीयांच्या सर्वंकर्ष शोषणाविरूध्द, धार्मिक पातळीवरचा पहिला विरोध दर्शवून समाजक्रांती करणारा स्त्री स्वातंत्र्याचा पहिला उद्गाता भगवान बुध्द आणि स्त्री स्वातंत्र्याचा महान प्रचारक व खंबीर पुरस्कर्ता महात्मा जोतिबा फुले या दोन गुरूंचा आदर्श डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांच्या स्त्री शिक्षण विषयक कार्यात निश्चितच प्रेरक ठरला आहे.

'गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल' असे डॉ. बाबासाहेब म्हणत. पण ते समजण्यासाठी शिक्षित माणसाची गरज असते. शिक्षणाशिवाय माणसाला स्वतःची ओळख होऊ शकत नाही. शिक्षण हे मानवी जीवनात क्रांती घडवू शकते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्री आणि एकूण दलितोध्दाराच्या कार्यात शिक्षणाचा प्रसार होणे महत्वाचे मानले होते. त्याचाच एक भाग म्हणून 1913 साली लंडन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्यानंतर तेथून आपल्या वडिलांचे मित्र श्री. जमेदार यांना पत्रात स्त्री शिक्षणाचे महत्व विशद करताना लिहितात की, मुलांप्रमाणे आपल्या मुलींनाही शिक्षण दिले पाहिजे. ज्ञान आणि विद्या या गोष्टी काही पुरूषांसाठी नाहीत त्या स्त्रीयांनाही आवश्यक आहेत. असा उल्लेख करताना आपल्या पूर्वजांनीही शिक्षणाचे महत्व जाणल्यामुळेच त्यांनी आपल्या मुलींना शिक्षण दिली. याचा त्यांनी आवूर्जन उल्लेख केला.

पुढे 1924 मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या 'बहिष्कृत हितकारणी सभे'च्या उद्दिष्टात आणि 15 ऑगस्ट 1936 रोजी स्थापन केलेल्या 'स्वतंत्र मजूर पक्षा'सारख्या राजकीय पक्षाच्या जाहिरनाम्यात सुध्दा शिक्षणावर भर दिलेला दिसतो. कारण संघटित होऊन संघर्ष करण्यासाठी, मग तो संघर्ष सामाजिक असो की, राजकीय असो, शिक्षण हा एक महत्वाचा दुवा आहे. हे त्यांच्या अनुभवी व कुशल नेतृत्वाने जाणले होते. दलितांच्या आणि स्त्रीयांच्या उध्दारासाठी संघटित शक्तीवर त्यांचा विश्वास होता. त्यांमुळे पुरूषांच्या परिषदांबरोबरच त्यांनी स्त्रीयांच्याही परिषदा आयोजित करत. स्त्री वर्गात जागृती झाली तर समाजाची फार मोठी प्रगती घडून येऊ शकते. याची त्यांना जाणीव झाली होती. म्हणूनच स्त्रीयांच्यात संघटितपणा येण्यासाठी व संघटित होऊन समाजाचे दुर्गुण नष्ट करण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. असे त्यांचे मत होते.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षण विषयक भूमिका तळमळीची आणि उदारमतवादी होती. व त्यामुळेच स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या अनेक परिषदा आयोजित केल्या, विशेषताः अखिल भारतीय महिला परिषद आयोजित केल्या, वेळोवेळी त्यांनी दिलेले भाषणे त्याचप्रमाणे बैठकीत मांडलेले अनेक ठराव यासर्वांमध्ये त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिलेला दिसतो. 1948 मध्ये 'पिपल्स एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना करून उच्च शिक्षणाची सोय केली. या संस्थेच्या वतीने 20 जून 1946 रोजी मुंबई येथे सिध्दार्थ कॉलेज या नावाने एक महाविद्यालय ही स्थापन केले.

## स्त्री दास्यत्व मुक्तीसाठी घटनात्मक सुधारणा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अस्पृश्य जातीत जन्मल्यामुळे जातीय विषमतेच्या अपमानाचे दुःख त्यांनी सोसलेले होते. तेच दुःख येथील स्त्रीयांच्या देखील वाट्याला आलेले आहे. त्यामुळे अनुसूचित जाती–जमाती, भटक्या–विमुक्त जाती व इतर मागासवर्गीय हे सर्व ह्या अपमानाचे बळी आहेत. हे जरी त्यांनी जाणले तसेच उच्चवर्णीय स्त्रीयांपासून तळागळातील स्त्रीयांपर्यत सर्व स्त्रीया या व्यवस्थेमुळे शोषित व पीडित आहेत हे ही जाणले आणि या सर्वांच्या मुक्तीचा उपाय म्हणजे कायदा होय. हे त्यांच्या दूरदर्शी बुध्दीला पटले. कारण ज्या मार्गाने ही विषमता व परावलंबित्व आले, त्याच मार्गाने त्या विषमतेचे परिमार्जन केले पाहिजे असे ठामपणे ठरवून त्यांनी स्त्रीयांच्या उत्थानासाठी कायद्याची गरज आहे हे जाणले.

स्त्री कामगारांसाठी सोयी सवलती मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 1942 मध्ये केंद्रीय मंत्रीमंडळात मजूरमंत्री या पदावर असताना त्यांनी गिरण्या, कारखाने येथे कामे करणाऱ्या कामगार स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने वेतन मिळावे, स्त्रीयांना बाळंतपणाची रजा मिळावी, या महिलांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणा घरे असावीत, 18 वर्षे पूर्ण झालेल्या स्त्रियांना ही मताधिकार असावेत, अशा अनेक मागण्या मान्य करून घेतल्या. पुढे 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र भारताच्या पहिल्या केंद्रीय मंत्रीमंडळात कायदेमंत्री झाले. भारतीय राज्यघटनेचे महत्वाचे काम मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केले. राज्यघटनेची बांधणी न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता या चार मुलतत्वांवर झालेली आहे. ही मुल्ये भारतीय जीवनात कधीच नव्हती. हजारो वर्षे विषमतेचीच परंपरा चालत आलेली होती व ती भारतीयांच्या रक्तकणात आत्मसात झालेली होती. त्यांमुळे समतेवर आधारित स्वातंत्र्याची आशा करणे व्यर्थच होते. धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान इ. मुळे व्यक्तीचे होणारे मुल्यमापन अधिकाधिक जाचक होत होते. त्यांमुळे हा जाच कायद्याने नष्ट करण्याची गरज आहे हा कायदा सर्वांना सारखाच लागू होईल असे संविधान तयार करण्यात आले. परंपरागत कायद्यानी जखडलेली स्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समानसंधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे, तर अर्थार्जन, सेवा क्षेत्रातील योजनाच्या संधीमुळे तसेच नोकरीमुळे मिळालेल्या स्वावलंबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालु लागल्याचे दिसून येते. आर्थिक धोरणातील उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळण्याचा अधिकार स्त्री–पुरूषांना समान राहिल तसेच त्यांचे वेतनही समान आहे. यांमुळे स्त्रीयांना एक बळकट आधार मिळाला. एवढेच नव्हे तर स्त्रीयांची पुनर्निर्मितीची क्षमता व प्रकृती लक्षात घेऊन स्त्रीयांसाठी प्रसूति सहाय्याची तरतूद ही केली आहे. कुटूंब नियोजना बाबतीत डॉ. बाबासाहेबांनी स्त्रीयांचे आरोग्य व कुटूंबाचे योग्य नियोजन हेच स्त्रीयांशी संबंधित आहे. त्याचबरोबर स्त्री मुक्ती संदर्भात त्यांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर ते स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री पदावर असताना स्त्रीयांची स्थिती बदलण्यासाठी त्यांनी हिंदू कोड बिलाची मांडणी केली. हिंदू कोड बिल हे डॉ. बाबासाहेबांच्या जीवनाचेच ध्येय झाले होते. 1947 पासून सतत 4 वर्षे 1 महिना 26 दिवस त्यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांचे अंतिम उद्दिष्ट स्त्रीयांना कायद्याने हक्क, दर्जा आणि प्रतिष्ठा प्राप्त व्हावी, हेच होते. परंतू हे बिल संसदेत संपूर्णपणे एकत्रित मान्य होऊ न शकल्याने डॉ. बाबासाहेबांनी आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला. नंतरच्या काळात स्त्रीविषयी सुधारणा कायदे हिंदू कोड बिलातून असे एक–एक अनेक कायदे अस्तित्वात येऊ लागले. हे खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कडून मांडले गेलेले प्रस्तावच आहेत. त्यामुळे आजच्या समाजातील स्त्रीयांच्या दर्जातील बदलासाठी आणि त्यांना मुक्त करण्यासाठी त्यांनी केलेली वैचारिकता व कृती हे त्यांच्या कार्याचे योगदान महत्वपूर्ण ठरते.

त्याचप्रमाणे भारतीय स्त्रीयांना व्यक्तिस्वातंत्र्य व समान हक्क दिल्याशिवाय त्यांची उन्नती होणे अशक्य आहे. याबद्दल डॉ. बाबासाहेबांना चांगली जाणीव होती. म्हणून भारतीय राज्यघटनेत त्यांनी सर्व महिलांना व्यक्तीस्वातंत्र्य व समान हक्क मिळवून दिले आहे. ह्या हक्कांमुळे स्त्रीयांच्या जीवनात ऐतिहासिक क्रांती घडून आली. कारण या देशातील स्त्रीया शासनात राष्ट्रपती, प्रधानमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री यासारख्या अनेकानेक पदावर आरूढ झालेल्या दिसून येतात. यामध्ये श्रीमती इंदिरा गांधी प्रधानमंत्री या पदावर काम करू शकल्या तर मुख्यमंत्री म्हणून पहिली दलित महिला मायावती यांनी या पदावर काम केल्या. तसेच जयललिता, ममता बॅनर्जी आणि पहिली स्त्री आयपीएस म्हणून किरण बेदी यांनी हे पद भुषविले. अशा अनेक महत्वाच्या पदावर आज स्त्रीया पद भूषविताना दिसून येतात. हे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्त्री उध्दार कार्याचे फलनिष्पती आहे.

## धर्मांतरानंतर स्त्री दास्यांचे विमोचन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले धम्म चक्रप्रवर्तन या संदर्भात अतिशय क्रांतिकारी आहे. बुध्द काळात स्त्रीयाचा सामाजिक दर्जा किती उच्च होता हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुध्द ॲण्ड हिज धम्म' या आपल्या ग्रंथात विशद केले आहे. आज बौध्द समाजातील स्त्रीया ज्या क्रांतिकारक रीतिने आपल्या सहचरी पुरूष वर्गाच्या खांद्याला खांदा लावून आंबेडकरी तत्वज्ञान प्रणित नवसमाजनिर्मितीसाठी गतिशिल आहेत. हा या धम्मचक्र प्रवर्तनाचा प्रेरक परिणाम होय

धर्मांतरानंतर बौध्द समाजाने विवाह विषयक जो विधी संस्कार अंगीकृत केले ते शास्त्रीय दृष्ट्या जसे प्रगत आहेत तसेच सांस्कृतिकदृष्ट्याही उच्चप्रतिचे व उच्चश्रेणीचे आहेत. यामध्ये बौध्द वधु ही वरापेक्षा यात्किंचितही कमी किंवा खालच्या दर्जाची नसून विवाह एक पवित्र संस्कार वा करार समजला जातो. या विवाहाच्या वेळी वधुवरांनी घ्यावयाच्या प्रतिज्ञा आज जशा युगसापेक्ष तशाच त्या समतेच्या प्रतिकच आहेत. बौध्द धम्माने हुंडा पध्दतीला दिलेली तिलांजली ही स्त्रीला विकत घ्यावयाच्या वनव्यापासून वंचित केल्यामुळे तिचा स्वाभिमान जोपासला जातो.

## आंबेडकरी तत्वज्ञानातील स्त्री चळवळ :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीत स्त्रीयांचा सहभाग हा महत्वाचा होता. थोडक्यात, सांगायचे म्हणजे 1927 च्या महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहात स्त्रीयांच्या सहभागाला सुरूवातच मुळी फार मोठ्या प्रमाणावर झाली. 1930 मध्ये काळाराम मंदिर सत्याग्रहात पहिली अटक होणारी तुकडी स्त्रीयांचीच होती. 1942 च्या नागपूरात आयोजित अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेत महिलांचा सहभाग इतका वाढला की, महिलांसाठी स्वतंत्र अधिवेशन घेण्यात आले. हा इतिहास सर्वानाच ठाऊक आहे. याकाळात राधाबाई कांबळे, जनाबाई चौधरी, अंजनाबाई देशभ्रतार, सुलोचनाबाई डोंगरे, शांताबाई दाणी, मीराबाई आंबेडकर, कीर्तिबाई व इंदिराबाई पाटील अशा अनेक महिला नेत्या आंबेडकरी चळवळ लोकांपर्यत नेत होत्या. 'चले जाव' चळवळीच्या तोडीचा हा स्त्री सहभाग होता. सार्वजनिक क्षेत्र आज देखील पुरूषप्रधान आहे. मग तेव्हा ते किती असेल ? अशा परिस्थितीत गावखेड्यातील सर्वसामान्य बाईला, दलित शोषित वर्गातील स्त्रीला घराचा उबंरठा ओलांडावयास लावून प्रत्यक्ष लढ्यात सक्रिय करणे ही गोष्ट अभूतपूर्व होती. आज ही अनेक स्त्री संघटना त्यांच्या मोर्च्यातील किंवा धरणे आंदोलनातील स्त्रीयांच्या अल्प उपस्थितीचा प्रश्न डोकेदुखी निर्माण करतोय. म्हणून आजही आंबेडकरी चळवळीतील स्त्रीयांचे हे संख्याबळ किती लक्षणीय असते हे महत्वाचे ठरते.

आज भारतामध्ये आंबेडकरी तत्वज्ञानातील प्रेरणा घेऊन जगणारा समाज ज्या झपाट्याने शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आदि विभिन्न आघाड्यांवर प्रगतीशील झालेला आहे. त्यामध्ये बौध्द स्त्रीचा वाटा अतिशय महत्वाचा आहे. बौध्द स्त्री आज तरी अन्याय अत्याचारपीडित वाटत असली तरी त्या अन्याय अत्याचाराविरूध्द उठाव करण्यासाठी ती इतर स्त्रीयांपेक्षा लवकर संघटित होऊन अत्याचाराचा विरोधात संघर्षासाठी धडपडत असते. या क्रांतिकारी प्रवासात ती आपल्या पुरूष समाजाची सखी, मित्र व तत्वज्ञ म्हणून पुढे येत आहे. हा आदर्श इतर भारतीय स्त्रीयांनी सुध्दा अंगीकारणे फलोचित ठरेल यात शंका नाही. त्याशिवाय स्त्री दास्य विमोचन अशक्यच आहे.

## निष्कर्ष :

थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्रियांच्या विकासासाठी पोटतिडकीने कार्य करीत, स्त्रियांचा सर्वांगीन विकास व्हावा, स्त्रियांना न्याय मिळावा, त्यांना प्रगतीच्या नव्या दिशा मिळाव्यात, त्यांचा सामाजिक दर्जा उंचवावा यासाठी उभा केलेला हा लढा होता. महिला संघटीत होऊन एकत्र आल्या पाहिजेत, स्त्रियांच्या पुढाकारानेच सामाजिक परिवर्तन होऊ शकेल असा स्त्रिविषयक आत्मविश्वास डॉ. आंबेडकरांच्या विचारातून स्पष्ट झालेला आहे. स्त्री-पुरुष समानतेचा स्वीकार भारतीय समाजाने करावा त्याशिवाय भारताचे पुरोगामीत्त्व सिद्ध होऊ शकणार नाही. समाजचा विकास हा स्त्रीच्या विकासाच्या मोजमापावर आधारलेले आहे. शोषित स्त्रियांच्या नेतृत्त्वाखालीच समाज अधिक प्रगती करु शकेल. हा क्रांतीकारक विचार आपल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सभा संमेलनातून व्यक्त करताना दिसतात. भारतीय स्त्रियांनी आपले मानवी अधिकार कायद्याने प्राप्त व्हावे अशी व्यापक भूमिका डॉ. बाबासाहेबांची असल्याचे आधोरेखित होते.

**संदर्भसूची :**


- ‘डॉ. बाबासाहेब आम्बेडकर जयंती आता ’ज्ञान दिवस’ म्हणून साजरा होणार
- ‘डॉ.बाबासाहेब आम्बेडकर यांचा शाळा प्रवेश दिन आता विद्यार्थी दिवस
- राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आम्बेडकर यांच्या प्रीत्यर्थ
- आम्बेडकरांचा शाळा प्रवेश दिन आता विद्यार्थी दिवस‘
- स्वातंत्र्य काळात आंबेडकरांचा सहभाग
- डॉ बी आर आंबेडकर यांचे शिक्षण